आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२८ जून २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- समुद्रापासून आकाशापर्यंत देश अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांचं प्रतिपादन

- अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियात पुन्हा तणाव

**आणि**

- फ्रान्समधे विमान कोसळून ११ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

भारत आज समुद्रापासून आकाशापर्यंत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे पस्तीसाव्या भागात ते देशोदेशीच्या श्रोत्यांशी बोलत होते. जून महिन्यात विविध क्षेत्रात देशानं साध्य केलेल्या ऐतिहासिक यशाचा त्यांनी आढावा घेतला.

कोलकात्यात झालेल्या कार्यक्रमात आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय ही अद्ययावत जहाजं भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्याचं त्यांनी सांगितलं. सी-295 या स्वदेशनिर्मित विमानानं पहिलं उड्डाण केल्याचं सांगून ते म्हणाले, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र तसंच हवाई अंतराळ क्षेत्राला नवं बळ मिळू लागलं आहे, रोजगाराच्या संधी वाढत आहेत आणि आत्मनिर्भर भारताचा संकल्प अधिक दृढ होत आहे. स्वदेशनिर्मित लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी डीआरडीओनं केल्याची माहिती त्यांनी दिली.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचं यशस्वी आयोजन झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सांगितलं, परदेशात अडीच हजारापेक्षा जास्त ठिकाणी योगाभ्यास करण्यात आला. देशातही योग विषयक कार्यक्रमांमध्ये कोट्यवधी लोकांनी सहभाग घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

आपल्या कुटुंबातल्या लग्नसोहळ्याचा आनंद समाजाबरोबर वाटून घेण्याचा प्रयत्न म्हणून नांदेडच्या बहादूरपुरा गावातल्या पेटकर कुटुंबानं गावातल्या सुमारे साडेतीन हजार लोकांच्या प्रत्येकी एक लाख रुपयांच्या अपघात विम्याची व्यवस्था केल्याचं उदाहरण त्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आपण देशवासियांना केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आभारही व्यक्त केले.

**- - - - होल्ड - बाईट MKB GLOBAL CRISIS - - - -**

आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनलेल्या मूर्ती खरेदी करू नयेत असं आवाहन त्यांनी केलं. मातीच्या मूर्ती पाण्यात सहजपणे विरघळत असल्यानं आपले जलस्त्रोत आणि पर्यावरणाचं रक्षण होतं, आणि त्यासोबतच आपली श्रद्धाही टिकून राहते असं ते म्हणाले. गणपतीची मूर्ती खरेदी करताना स्थानिक मूर्तिकारांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करून व्होकल फॉर लोकलचा संकल्प अधिक दृढ करावा असं आवाहनही त्यांनी या निमित्तानं केलं.

**<><><><><>**

आर्थिक समृद्धीसह सागरी सुरक्षितेची हमी देणारा हिंदी महासागर आणि परस्पर विश्वासावर असणारी देशांची भागीदारी हे भारताचं स्वप्न आहे असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सेशेल्समध्ये केलं. उच्चस्तरीय बैठकीनंतर सेशेल्सचे अध्यक्ष पॅट्रीक  हर्मिनी यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत  होते. बैठकीत दोन्ही नेत्यांनी भारत आणि सेशेल्समधील सहकार्य आणि स्थानिक तसंच आंतरराष्ट्रीय बाबींवर चर्चा केली.  हिंदी महासागर क्षेत्राची सुरक्षा आणि समृद्धी ही सामायिक जबाबदारी असल्याचं मोदी यांनी यावेळी नमूद केलं.

भारत आणि सेशेल्समध्ये कृषी, अर्थव्यवहार, अंतराळ आणि आरोग्यासह अनेक क्षेत्रातील करार यावेळी झाले. सागरी सुरक्षा हा दोन्ही देशांना जोडणारा धागा आहे असं मत सेशेल्सच्या अध्यक्षांनी यावेळी व्यक्त केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सेशेल्सच्या संसदेला संबोधित केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना गार्डियन ऑफ द ब्ल्यू होरायझन हा सेशेल्सचा सर्वोच्च नागरी पुरस्कार सेशेल्सचे

राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. पुरस्कार दिल्याबद्ल नरेंद्र मोदी यांनी सेशेल्सच्या जनतेचे आभार मानले.

<><><><><>

‘विकसित भारत २०४७’ हे स्वप्न साकार करण्यासाठी खेड्यांचा विकास केंद्रस्थानी असल्याचं केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. विकसित भारत ग्रामीण योजनेसाठी ग्रामविकास मंत्रालयानं राज्य सरकारांच्या सहभागानं एक लाख ५१ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद केल्याची माहिती त्यांनी नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय ग्रामीण विकास संमेलनात दिली.

ग्रामपंचायतींना बळकटी देण्यासाठी आर्थिक सहाय्य यापुढेही सुरू राहील, असं ते म्हणाले. ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत १० कोटींहून अधिक महिला बचत गटांशी जोडल्या गेल्याचं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमुळे ग्रामीण रस्ते आणि पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारल्याचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी चौहान यांच्या हस्ते ग्रामीण अंतर्गत लेखापरीक्षण पोर्टलचं उद्घाटन करण्यात आलं.

<><><><><>

महाराष्ट्र छत्तीसगड सीमेजवळच्या बालबेडा जंगल परिसरात नक्षलींनी लपवून ठेवलेला शस्त्रांचा साठी गडचिरोली पोलिसांनी जप्त केला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी विशेष शोधमोहिम राबवली. विशेष अभियान पथक, प्राणहिता युनिट, बीडीडीएस आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने काल आणि परवा ही कारवाई केली.

<><><><><>

अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम फिसकटल्यानं पश्चिम आशियातली सुरक्षा स्थिती पुन्हा एकदा बिकट झाली आहे. गेल्या काही तासांमध्ये दोन्ही बाजूंनी एकमेकांवर लष्करी हल्ले केले. इराणनं आपल्या व्यापारी तेलवाहू जहाजावर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप करत अमेरिकेनंही होर्मुझ सामुद्रधुनीजवळ इराणच्या दहा लष्करी ठाण्यांवर हल्ला केला. त्यानंतर इराणनं कुवेत आणि बहारीनमधल्या अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र डागली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कडक शब्दांत इशारा दिला आहे. युध्दविरामाचं आणखी उल्लंघन केलं तर मोठं  लष्करी प्रत्युत्तर दिलं जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

लेबनॉन, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात नुकत्याच झालेल्या त्रिपक्षीय कराराला हिझबुल्लाचे सरचिटणीस शेख नईम कासिम यांनी विरोध केला आहे. हा करार लेबनॉनच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणारा असल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान, लेबनॉनचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात आज दूरध्वनीवरून चर्चा झाली.

<><><><><>

व्हेनेझुएलामधे झालेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर अमिस्ताद मोहिमे अंतर्गत भारताने पाठवलेली मदत व्हेनेझुएला इथं पोहचली. भारताने पाठवलेलं मदत साहित्य, वैद्यकीय मदत यामुळे व्हेनेझुएलातल्या बचावकार्याला मदत होईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. व्हेनेझुएलामधे झालेल्या भुकंपामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी, वित्तहानी झाली आहे. त्यामुळे भारताने हवाई दलाची दोन विमानं मदतकार्य घेऊन शुक्रवारी पाठवली. तसंच बचावकार्याला मदत करण्यासाठी ४१ सदस्यांचं बचाव पथकही पाठवण्यात आलं आहे.

वेनेझुएलामधे आजही सकाळी अराग्वा किनाऱ्याजवळ भूकंपाचा धक्का जाणवला त्याची तीव्रता ५ पूर्णांक ६ दशांश रिक्टर नोंदली गेली. जपानमध्येही आज सकाळी पुन्हा एकदा भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिक्टर स्केलवर ६पूर्णांक १ दशांश इतकी होती.  कोणत्याही प्रकारचा सुनामीचा इशारा देण्यात आलेला नाही. तसेच,  जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

<><><><><>

फ्रान्सच्या ईशान्य भागात आज स्काय डायव्हिंगसाठी वापरलं जाणारं एक विमान कोसळून त्यातील सर्व ११ जणांचा मृत्यू झाला. मेर्थ-ए-मोझेल प्रांताचे प्रतिनिधी येव्हज सेग्यू यांनी ही माहिती दिली. नॅन्सी शहराजवळ हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच आपत्तीनिवारण पथकं घटनास्थळी दाखल झाली असून, अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचं काम सुरू असल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे.

<><><><><>

जून महिन्यात आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून ५३ हजार २२ कोटी रुपये समभाग विक्रीद्वारे काढून घेतले आहेत. मात्र महिन्याच्या पूर्वार्धाच्या तुलनेत दुसऱ्या पंधरवड्यात विक्रीचा जोर काहीसा ओसरला असून विशिष्ट समभागांच्या खरेदीला गुंतवणूकदारांनी पसंती दिली आहे.

<><><><><>

देशभरात आज पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेंतर्गत राज्यात सर्वत्र पाच वर्षांपर्यंतच्या बालकांचं लसीकरण केलं गेलं. पोलिओची लस देण्याकरता ठिकठिकाणी बूथ उभारण्यात आले, ट्रांझिट बूथ, फिरती पथकंही कार्यान्वित करण्यात आली.

<><><><><>

भारत आणि आर्यलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना आज बेलफास्ट इथं सुरु आहे. आयर्लंडच्या १५४ धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा हे भारताचे दोन्ही सलामीवीर भोपळाही न फोडता तंबूत परतले. त्यानंतर इशान किशन आणि श्रेयस अय्यरही काही धावांच्या फरकाने बाद झाले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ८ षटकात भारताच्या ४ बाद ५४ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

टीईटी पेपर फुटीमधल्या आरोपींना भिवंडी जिल्हा न्यायालयाने ६ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातले आणखी दोन आरोपी फरार असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. या पेपरविक्रीसाठी झालेले आर्थिक व्यवहार, यात आंतरराज्यीय रॅकेट कार्यरत होते का या सर्व बाबींच्या तपासासाठी पोलिसांनी १० दिवसांच्या कोठडीची केलेली  मागणी न्यायालयाने मान्य केली.

<><><><><>

राज्य सरकारची कर्जमाफी ही शेतकऱ्यांची फसवणूक असून शेतकऱ्यांना माफी नव्हे तर कर्जमुक्ती द्यावी, अशी मागणी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज धाराशिवमधल्या शिवसैनिक मेळाव्यात केली. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पक्षांतरावरही त्यांनी टीका

केली. तपासयंत्रणांच्या दबावामुळेच ओमराजे यांनी शिवसेना सोडल्याचा आरोप यावेळी खासदार संजय राऊत यांनी केला.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत पी व्ही नरसिंह राव यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. देशाच्या इतिहासातल्या एका अत्यंत कठीण कालखंडात नरसिंह राव यांनी देशाच्या प्रगतीमध्ये महत्वपूर्ण आणि शाश्वत योगदान दिलं, असं त्यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनीही पी व्ही नरसिंह राव यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली असून नरसिंह राव यांचं भारताच्या आर्थिक प्रवासातलं योगदान उल्लेखनीय असल्याचं नमूद केलं आहे.

**//<><><><><>//**